महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १० जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुंब्रा स्थानकाजवळ रेल्वे अपघात

## चौघांचा मृत्यू ; नऊ गंभीर जखमी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंब्रा-दिवा रेल्वे स्थानकांदरम्यान दोन लोकलमधील प्रवाशांचा एकमेकांना धक्का लागल्याने खाली ट्रॅकवर पडले. या दुर्घटनेत 4 प्रवाशांचा मृत्यू झाला. अपघातातील 10 जणांना कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल केलं आहे. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच एकाचा मृत्यू झाला तर गंभीर जखमी असलेल्या दोघांना ज्युपिटर रुग्णालयात दाखल केले आहे. सात जखमी रुग्णांवरील धोका टळला असून या अपघातात आतापर्यंत एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे. हे प्रवासी कसारा – सीएसएमटी लोकलमधील होते. लोकलला लटकलेले प्रवासी एक्स्प्रेसला घासले आणि त्याच्या मृत्यू झाल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून 8 प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. घटना घडल्यनंतर घटनेला जबाबदार कोण, रेल्वे सेवेवर परिणाम झाला आहे की नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मध्ये रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्निल निला यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार पाच प्रवासी पुष्पक एक्स्प्रेममधून पडले आहेत. मुंब्रा स्थानकाजवळ घटना घडली आहे. कसाऱ्याला जाणारी गाडी होती. दिवा आणि मुंब्रा स्थानका दरम्यान आता रुग्णवाहिकेची व्यवस्था केली जात आहे. रुग्णवाहिका पोहोचल्यानंतर आणि उपचार झाल्यानंतर प्रवाशांच्या प्रकृतीची माहिती कळू शकेल. प्रवासी पुष्पकमधून पडले आहेत की दुसऱ्या कोणत्या गाडीतून पडले आहेत याबद्दल अधिकृत माहिती सध्या समोर आलेली नाही. कसारा आणि पुष्पक या दोन्ही गाड्या बाजू-बाजूने जात असल्यामुळे प्रवाशी कोणत्या गाडीतून पडले अद्याप कळू शकलेलं नाही.'

### जखमी झालेले प्रवाशी

1. शिवा गवळी (वय 23) प्रकृती चिंताजनक असल्यानं छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातून ज्युपिटर हॉस्पिटलला हलवल)
2. आदेश भोईर (वय 26, रा. आढगाव, कसारा) प्रकृती स्थिर शिवाजी महाराज रुग्णालय इथं उपचार सुरू)
3. रिहान शेख (वय 26, रा. भिवंडी, प्रवास: कल्याण ते ठाणे) प्रकृती स्थिर शिवाजी महाराज रुग्णालय इथं उपचार सुरू)
4. अनिल मोरे (वय 40) प्रकृती चिंताजनक, उपचारासाठी ज्युपिटर हॉस्पिटलला हलवल)
5. तुषार भगत (वय 22, प्रवास: टिटवाळा ते ठाणे) प्रकृती स्थिर, शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू)
6. मनीष सरोज (वय 26, रा. दिवा साबेगाव, दिवा) प्रकृती स्थिर, शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू)
7. मच्छिंद्र गोतारणे (वय 39, रा. वाशिंद) प्रकृती स्थिर, शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू)
8. स्नेहा धोंडे (वय 21, रा. टिटवाळा, प्रवास: टिटवाळा ते ठाणे) प्रकृती स्थिर, शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू)
9. प्रियंका भाटिया (वय 26, रा. शहाड, कल्याण) प्रकृती स्थिर, शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू)

### मृत्यू झालेले प्रवाशी

1. केतन दिलीप सरोज (वय २३, रा. तानाजी नगर, उल्हासनगर)
2. राहुल संतोष गुप्ता (वय माहिती नाही)
3. विकी बाबासाहेब मुख्यदल (वय 34, रेल्वे पोलीस कर्मचारी)
4. मयूर शाह (वय ४५)

## संपादकीय

रविंद्र घोडविंदे

### रेल्वे प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर

दिवा मुब्रा कळवा स्थानका दरम्यान रेल्वे दिनांक 9 जून 2025 रोजी सकाळी झालेला अपघात एक दुर्दैवी घटनाच या अपघातात हक नाहक झालेले मृत्यू आणि अनेक जन गंभीर झाले आहेत. सकाळच्या वेळी कामावर जाण्यासाठीची घाई गर्दी आणि रेल्वे गाड्यातील वाढती गर्दी पहिली की मन सुन्न होते. जीवाची पर्वा न करता हा रोजचाच सुरु असलेला प्रवास संपणार कधी? रेल्वे प्रवाशी म्हणजे गुरे ढोरे समजायची का? या प्रवाशांना आवश्यक सुविधा मिळणार कधी?

बरे ज्या उपगरीय रेल्वे गाडीतून प्रवास केला जातो त्यात सुरक्षितता किती? मानवी जीव या रेल्वेतुन प्रवास करतात याचे भान नसल्यागत रेल्वे प्रशासन आज प्रवाशांना सुविधा देत आहे. त्यामुळे अपुऱ्या सुविधा गर्दीच्या वेळी गाड्याची कमतरता, नको त्यावळी मेल एक्सप्रेसच्या गाड्या यामुळे उपनगरीय रेल्वे सेवेवर ताण वाढत आहे.

दळणवळण सुविधेत एकमेव रेल्वे सेवा हाच प्रवशासाठी योग्य पर्याय उरल्याने आज रेल्वे च्या प्रवाशी संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे वाढत्या प्रवाशी सखेला आवश्यक तशा रेल्वे गाड्या नसल्याने लोक अर्धा पाय डब्याच्या दरवाजात तर उर्वरित सर्व शरीर बाहेर या अवस्थेत प्रवास करत आहेत. उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या समस्या वेगळ्या आहेत. त्यांच्यावर उपाययोजना न करता प्रशासन मात्र गेंड्याची कातडी पांघरून गप्प चक्क झोपले आहे. त्यामुळेच असे अपघात नित्याचे ठरत आहेत.

# काळू धरण विस्थापितांचे मुरबाड तालुक्यातच पुनर्वसन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड, ता. ९ (बातमीदार) :** कल्याण, ठाणे शहरांना पाणीपुरवठा व्हावा म्हणून मुरबाड तालुक्यात काळू नदीवर धरण बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे तालुक्यातील १९ गावांतील जमीन बाधित होणार असून, मोजणीसाठीचे आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे विस्थापितांचे पुनर्वसन मुरबाड तालुक्यातच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

काळू धरणामुळे कुडशेत, फांगणे, माळ, भोराडे, दिवाण पाडा, दिघे फळ, उदाळ डोह, तळेगाव, फांगलोशी, न्याहाडी, मोरोशी, झाडघर, चासोळे, खरशेत, उंबरोली, फांगुल गव्हाण, जडई, खुटलं बारागाव, आंबिवली, वैशाखरे अशी १९ गावे बाधित होणार आहेत. धरणामुळे बाधित होणाऱ्यांना शासनाकडून नोकरीबरोबर



नुकसानभरपाई, असा दुहेरी लाभदिला जाणार आहे. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांसह अनेक लोकांनी विस्थापित होणाऱ्या गावांमध्ये घरे बांधण्याचा धडाका गेल्या दोन वर्षांपासून सुरू केला आहे. या प्रकाराने गावातील घरांच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच बऱ्याच ठिकाणी बोगस घरपट्टी नोंदवल्याच्या तक्रारींमुळे ठाणे जिल्हा परिषदेमार्फत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### आठ गावांमध्ये मोजणी

**मुरबाड तालुक्यातील खापरी, विढे, बुरसुगे, मांदोशी, चासोले, सायले, माळ, खेड या ठिकाणी विस्थापितांचे पुनर्वसन होणार आहे. या गावातील खासगी जमिनीचे संपादन करण्यासाठी लवकरच जमिनीची मोजणी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी ठाणे जिल्हा कृषी अधीक्षक, तालुका कृषी अधिकारी मुरबाड, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग दोन ठाणे, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मुरबाड, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती मुरबाड, सहाय्यक वनसंरक्षक मुरबाड, वन परिक्षेत्र अधिकारी टोकावडे विभाग या शासकीय कार्यालयाच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्यासाठी प्रांताधिकारी कल्याण यांनी आदेश दिले आहेत.**

# मुंब्रा रेल्वे दुर्घटनेत कल्याणमधील जीआरपी जवानाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुंब्रा स्थानकात आज सकाळी घडलेल्या दुर्दैवी घटनेत विकी मुख्यादल (वय अंदाजे 35), ठाणे जीआरपीमध्ये कार्यरत असलेल्या जवानाचा लोकलमधून पडून मृत्यू झाला. नेहमीप्रमाणे सकाळी ड्युटीसाठी मुंबईकडे जात असताना लोकलमधील प्रचंड गर्दीमुळे त्यांचा तोल गेला आणि ते मुंब्रा स्थानकात खाली पडले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. विकी मुख्यादल हे कल्याण पूर्वेतील लोकग्राम संकुलातील सिंधू सोसायटीमध्ये पत्नी आणि मुलासोबत राहत होते. गेल्या दोन वर्षांपासून ते



या परिसरात वास्तव्यास होते. त्यांच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विकी यांच्या लहान मुलाचे भविष्य सरकारने सुरक्षित करावे. आणि अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी रेल्वेने ठोस पावले उचलली पाहिजेत अशी मागणी विकी यांच्या शेजारी स्नेहा कावळे यांनी केली आहे.

## थोडक्यात महत्वाचे



# दिवा ते सीएसएमटी जलद लोकल सुरु करा

### खासदार श्रीकांत शिंदे यांची रेल्वेकडे मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिवा ते सीएसएमटी जलद लोकल सुरु कराशिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची रेल्वे प्रशासनाकडे मागणी मुंब्रा लोकल अपघातातील जखमींची रुग्णालयात जाऊन केली विचारपूस पाचवी आणि सहावी मार्गिका 'सीएसएमटी'पर्यंत लवकर कार्यान्वित करा ठाणे, ता. ९ जून २०२५ लोकलमधील गर्दीचा भार कमी व्हावा आणि अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दिवा ते सीएसएमटी जलद लोकल सुरु करण्याची मागणी कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. मुंब्रा रेल्वे स्थानकात सोमवारी सकाळी झालेल्या लोकल अपघातातील जखमींची खासदार डॉ. शिंदे यांनी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून खासदार डॉ. शिंदे यांनी याप्रसंगी शोक व्यक्त केला. यावेळी शिवसेना खासदार नरेश म्हस्के आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कल्याण-कर्जत परिसरात मोठ्या संख्येने नागरिक राहतात. त्यामुळे या मार्गावर लोकल फेऱ्या वाढवणे आवश्यक आहे. प्रवासी संघटनांकडून लोकल संख्या वाढवण्याची वारंवार मागणी केली जाते. ठाणे-कल्याण पाचवी आणि सहावी मार्गिका सुरु झाल्यानंतर लोकल फेऱ्यांची संख्या काही प्रमाणात वाढली, मात्र पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत विस्तार होणे आवश्यक आहे. यासाठी रेल्वे प्रशासनाचे काम सुरु आहे. हे काम जेव्हा पूर्ण होईल तेव्हा लोकल फेऱ्यांची संख्या आणखी वाढेल, असा विश्वास खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला. कल्याणच्या पुढे तिसरी आणि चौथी मार्गिका तयार करण्याचे काम सुरु असून यासाठी जमीन अधिग्रहण केले जात आहे. लोकल फेऱ्या जेव्हा वाढतील तेव्हा गर्दीचे व्यवस्थापन करणे सोपं जाईल. नव्या मार्गिका वाढवण्याबरोबरच १२ डब्यांच्या लोकल १५ डब्यांमध्ये परावर्तीत करणे तितकेच गरजेचे आहे, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

### मंत्री गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, निरंजन डावखरे

# मुंब्रा अपघातग्रस्तांच्या भेटीला

**छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात जाऊन जखमींची चौकशी**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान घडलेल्या दुर्दैवी रेल्वे अपघातात १० प्रवासी ट्रेनमधून खाली पडून जखमी झाले. या घटनेनंतर जखमी प्रवाशांना तात्काळ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय (शिवाजी हॉस्पिटल) येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण , जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी भेट दिली आणि जखमी प्रवाशांची विचारपूस करून जखमी प्रवाशांना धीर दिला आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून उपचारांची माहिती घेतली. यावेळी आमदार श्री. निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष श्री. संदीप लेले पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.









# गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

सर्वतःपाणिपादं
तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य
तिष्ठति ॥ १३-१३ ॥

ते सर्व बाजूंनी हात-पाय असलेले, सर्व बाजूंनी डोळे, डोकी व तोंडे असलेले, तसेच सर्व बाजूंनी कान असलेले आहे. कारण ते विश्वात सर्वाला व्यापून राहिले आहे.
॥ १३-१३ ॥

सर्वेन्द्रियगुणाभासं
सर्वेन्द्रियविवर्जितम् । असक्तं
सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च
॥ १३-१४ ॥

ते सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहे. परंतु वास्तविक सर्व इंद्रियांनी रहित आहे. ते आसक्तिरहित असूनही सर्वांचे धारण-पोषण करणारे आणि निर्गुण असूनही गुणांचा भोग घेणारे आहे.
॥ १३-१४ ॥


बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव
च । सूक्ष्मात्वात्तदविज्ञेयं दूरस्थं
चान्तिके च तत् ॥ १३-१५ ॥

ते चराचर सर्व प्राणिमात्रांच्या बाहेर व आत परिपूर्ण भरले आहे. तसेच चर आणि अचरही तेच आहे आणि ते सूक्ष्म असल्यामुळे कळण्याजोगे नाही. तसेच अतिशय जवळ आणि दूरही असलेले तेच आहे.
॥ १३-१५ ॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव
च स्थितम् । भूतभर्तृ च तज्ज्ञेयं
ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १३-१६ ॥

तो परमात्मा विभागरहित एकरूप असा आकाशासारखा परिपूर्ण असूनही चराचर संपूर्ण भूतांमध्ये वेगवेगळा असल्यासारखा भासत आहे. तसाच तो जाणण्याजोगा परमात्मा विष्णुरूपाने भूतांचे धारणपोषण करणारा, रुद्ररूपाने संहार करणारा आणि ब्रह्मदेवरूपाने सर्वांना उत्पन्न करणारा आहे.
॥ १३-१६ ॥

## रेसिपी
## छोले कटलेट



साहित्य - एक कप -भिजवलेले छोले, एक -कांदा, दोन -हिरव्या मिरच्या,एक चमचा -आले पेस्ट, कोथिंबीर, मिरचीचे तुकडे, एक चमचा -चाट मसाला, अर्धा चमचा -मिरे पूड, ब्रेडचे तुकडे, चवीनुसार मीठ

कृती- सर्वात आधी एका भांड्यात भिजवलेले छोले ,आल्याची पेस्ट, मिरची, ब्रेडचे तुकडे, मीठ, चाट मसाला आणि काळी मिरे पूड घालून मिक्सर वर पेस्ट करून घ्यावी .त्यात चिरलेला कांदा आणि ब्रेडचे छोटे तुकडे चार चमचे मैदा घाला.तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात बेसन आणि रवा देखील घालू शकता. त्यात उकडलेले बटाटे, किसलेले चीज किंवा काजू देखील घालू शकता.थोडे तेल घालून कटलेटचा आकार द्या. व ते शॅलो फ्राय करा. त्यावर चाट मसाला शिंपडावा. तर चला तयार आहे छोले कटलेट

# जागतिक नेत्रदान दिन



आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात.

जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# टक्केवारीच्या मागे लागू नका

## खा.सुरेश म्हात्रे यांचा अधिकाऱ्यांना इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : मोठमोठे लोक ईडी, सीबीआयच्या फेऱ्यात अडकत आहेत. त्यात तुमचाही नंबर लागू शकतो असा सूचक इशाराच भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खा.सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे. शहापूर उपजिल्हा रुग्णालयातील हलगर्जीपणामुळे दोन निष्पाप जीवांचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर गुरुवारी ठाणे येथे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण आढावा बैठक आयोजित केली होती. त्यावेळी त्यांनी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई,मंडळ ठाणे उपसंचालक अशोक नांदापूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक कैलास पवार,जिल्हा आरोग्य अधिकारी गंगाधर पारगे यांसह विज मंडळाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

शहापूरच्या आरोग्य विषयक समस्यांवर बोलतांना उपजिल्हा रुग्णालय शहापूर येथे रुग्णांची होत असलेली गैरसोय व आरोग्य सुविधांचा अभाव तसेच शहापूर येथे लवकरात लवकर आयसीयू सुविधा उपलब्ध व्हावी अशा सूचना खा. म्हात्रे यांनी केल्या.शहापूर येथील प्रत्येक खाजगी रुग्णालयात आयसीयू बेड रुग्णांसाठी आरक्षित करावे असे सांगितले असता जिल्हा शल्यचिकित्सक यांनी इमर्जन्सी म्हणून २ आयसीयू बेड रुग्णांसाठी तत्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वाशित केले.दरम्यान मला जनतेने निवडुन दिले आहे.काहीही झाले तरी मला फक्त जनतेची कामे मार्गी लावायची आहेत.मला परमेश्वराने भरपुर काही दिले आहे. त्यामुळे मी कुणाची टक्केवारी घेत नाही आणि अधिकारी वर्गाने देखील टक्केवारीत गुंतु नये अन्यथा त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतील असे सांगून भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली.




बेफिकीरीचे दोन बळी

शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ येथील प्रेम सदगीर हा १४ वर्षीय मुलगा मुलांसोबत क्रिकेट खेळत होता.चेंडू लांब गेल्याने तो चेंडू आणण्यासाठी गेला असता त्याला विषारी सापाने दंश केला.दंश झाल्याचे लक्षात येताच तात्काळ त्याला शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.मात्र तज्ञ व माहीतीगार डॉक्टर नसल्याने केवळ रक्त तपासणीच्या आधारावर या १४ वर्षीय बालकावर एक तास कोणतेही उपचार न केल्याने अखेर त्याचा बेडवर मृत्यू झाला.तो जीवंत असताना पालकांनी उपचारासाठी खूप विनंती केली.मात्र कोणीही त्यांच्या विनंतीकडे लक्ष दिले नसल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे.तर शहापूरच्या आरमाईट इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये शिकणाऱ्या राणी निमसे हिला झोपेतच रात्रीच्या सुमारास मण्यार जातीच्या सापाने दंश केला. काहीतरी चावल्याची जाणीव झाल्याने घरच्या लोकांनी तिला तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.तिथे डॉक्टरांनी तिच्यावर प्रथमोपचार सुरू केले,पण अत्याधुनिक यंत्रणा व सोयीसुविधांची कमतरता असल्याने राणी हिला ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला डॉक्टरांनी नातेवाईकांना दिला. दरम्यान रस्त्यातच १९ वर्षीय राणीचा मृत्यू झाला.

रुग्णालयाची रिकामी झोळी

मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील शहापूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. तालुक्यातील गरीब व गरजू नागरिक या उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येत असतात.मुंबई -नाशिक राष्ट्रीय महामार्गावर नेहमीच किरकोळ व मोठे अपघात होत असतात.मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे हे रुग्णालय सेवा देण्यास सक्षम नाही.या रुग्णालयात मूलभूत सुविधांचा अभाव आहे. शहापूरला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळालेला असला तरी अपुरे व प्रभारी कर्मचारी,औषध पुरवठा, उपजिल्हा रूग्णालय वैद्यकीय अधिक्षक पद प्रभारी असणे,उपअधिक्षक पद प्रभारी असणे,हाडांचे डॉक्टर नाहीत, स्त्रीरोग तज्ञ नाहीत, वैद्यकीय अधिकारी गट अ,ब, आयसीयु टेक्निशियन इत्यादी पदे रिक्त असून चार रुग्णवाहिका नादुरुस्त अवस्थेत आहेत.किंबहुना अशा विविध कारणांमुळे येथील यंत्रणेवर ताण येतो.

# आ. विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (शरद शहाणे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 25 रामदास वाडी येथील माजी नगरसेविका सौ. प्रियांका विद्याधर भोईर यांच्या प्रभागात १) पोर्णिमा टावर ते पंच परमेश्वर मंदिर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे, २) पंचपरमेश्वर मंदिर ते नव तुलसी अपार्टमेंट रामकृष्ण नगर येथील रस्ता सिमेंट कॉंकटीकरण करणे या दोन रस्त्यांचे भूमिपूजनचा कार्यक्रम संपन्न झाला.



दिनांक आठ जून 2025 रविवारी सायंकाळी सहा वाजता कल्याण पश्चिम चे लोकप्रिय आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या दोन्ही रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रीट करण्याच्या कामासाठी कल्याण पश्चिमचे लोकप्रिय आमदार विश्वनाथ भोईर यांनी 60 लक्ष रुपये आमदार निधी दिला आहे.या कार्यक्रमात शिवसेना शाखाप्रमुख संदीप पवार, माजी नगरसेविका सौ प्रियंका विद्याधर भोईर, विद्याधर भोईर उपशाखाप्रमुख, माजी नगरसेवक., समस्त पदाधिकारी ,महिला आघाडी, शिवसैनिक, युवा सैनिक उपस्थित होते.

# समृद्धीच्या वाटा कार्यक्रमात महिलांचा उत्फुर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(बाळासाहेब भालेराव)** : विविध नावीन्यपूर्ण उपक्रमशीलतेतून सतत चर्चेत असलेल्या गुलाबी कातकरी वाडी शेलारी यांच्या वतीने कातकरी भगिनींचे प्रबोधन व्हावे म्हणून समृद्धीच्या वाटा या अभिनव उपक्रमाचे आयोजन

रविवार ८ जून रोजी शांताराम बाबू बांगर यांच्या शांताई निसर्ग पर्यटन केंद्र शेलारी म्हाडस येथे करण्यात आले होते. याप्रसंगी पारंपारिक साज देत बाळासाहेब खांडेकर उपजिल्हाधिकारी ,मुंबई यांची ढोल ताशाच्या गजरात सजवल्या बैलगाडीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सुरूवातीला गुलाबी वाडीतील मुलीनीआदिवासी नृत्य सादर केले या प्रसंगी मार्गदर्शन करताना उपजिल्हाधिकारी बाळासाहेब खांडेकर यांनी कातकरी समाजा बाबत गौरव उद्गार काढले तसेच या समाजाची प्रगती व्हावी म्हणून विविध उपक्रम राबविले पाहिजेत असे मत व्यक्त केले

भावना राजभोर शिक्षणाधिकारी (योजना)जि.प.ठाणे यांनी. मार्गदर्शक करतांना आजीबाई शाळा, आई शाळा उपक्रमांचे कौतुक केले.कोकण आदर्श पुरस्कार प्राप्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरबाड संदीप गिते यांनी आदिवासी समाजाकडून वनौषधी ज्ञान घेवून ते सर्वापर्यंत जाण्यासाठी प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली .

गेली सहा वर्ष सातत्याने आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, रोजगार, व्यसनमुक्ती, चंदन परिषद या माध्यमातून गुलाबी कातकरी वाडीने विशेष प्रगती केली आहे. याचाच आदर्श कातकरी समाजाने घ्यावा म्हणून या उपक्रमाचे आयोजन केले होते अशी माहिती संयोजक योगेंद्र बांगर यांनी दिली.



सान्वी सोशल वेल्फेअर ऑर्गनायझर्स अध्यक्षा ईशा रावत, शितल आहेर यांनी 500आदिवासी महिलांसोबत शिक्षण संवाद साधला व मध,साखर अशा जीवनावश्यक वस्तूं वाटप केल्या तसेच 150 गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण किट देण्यात आले.दिनेश माळी, नारायण घावट, भालचंद्र गोडांबे, यानी स्वाक्षरी उपक्रमात मदत केली .मानवसेवा सामाजिक संस्था,सुरेश बांगर,सखी कार्यकर्ती संस्था विलेपार्ले यांचे योगदान लाभले टिम परिवर्तन,आंघोळीची गोळी संस्थेचे अविनाश पाटील, यांनी पर्यावरण. जनजागृतीसाठी स्वतंत्र दालन उभे केले होते शाळकरी मुलासोबत सर्पमित्र सुहास पवार, साहसी वीर अजित कारभारी, यांनी संवाद साधला.उद्योजक साबण, अगरबती, उटणे प्रशिक्षक चेतन पोतदार यांनी शेकडो महिलांना साबण बनवण्यास शिकवले सामाजिक कार्यकर्ते तानाजी घागस, वनौषधी मित्र उमेश चौधरी,रानभाज्या अलका ताई वाघ, महेश रूमाले,बांबूकाम संताजी घोरपडे, ,पक्षीमित्र प्रविण विशे,चंदन मार्गदर्शक अमोल रोंगे लातूर, निसर्ग उपचार रेखा नाईक वसई , वैद्य पृथ्वी जामघरे संतोष मार्के या मान्यवरांनी मार्गदर्शन केले उपस्थित 500 कातकरी भगिनींना पावसाळयासाठी रेनकोट वाटप करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुलाबी वाडी शेलारी, शितल मोरे,सुधाकर भोईर, योगेश तेलवणे, गोविंद घावट,तुकाराम नामा भोईर, अरुण भोईर कमलाकर भोईर,वसंत भोईर , भाऊ भोईर,शंकर विशे पुंडलिक विशे युसुफ शेख, महेंद्र बांगर, प्रतीक बांगर आशा भोईर, भिमाबाई भोईर, भारती भोईर दर्शना केंबारी ,मोनिका भोईर यांनी मेहनत घेतली. सामाजिक कार्यकर्ते बाळू करलग,दशरथ तारमळे, दीपक घागस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेंद्र बांगर यांनी केले.

# भिसोळ येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संत निरंकारी मिशनच्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन अंतर्गत आयोजित रक्तदान शिबिरात एकूण ६० युनिट्स रक्त जमा करण्यात आले. रक्तदात्यांमध्ये ४२ पुरुष तर १८ महिला होत्या. संत निरंकारी रक्त पेढीने रक्त संकलित केले. या शिबिराचे उद्दिष्ट गरजू रुग्णांसाठी रक्त संकलन करणे आणि रक्तदानाचे महत्त्व जनमानसात पोहोचवणे होते. हे शिबिर रविवारी संत निरंकारी सत्संग भवन, भिसोळ, पांजरापोळ, तालुका - कल्याण येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मिशनच्या भिसोळ व सावर्णे शाखेतील रक्तदात्यांनी उत्साहाने भाग घेतला. गोळा झालेले प्रत्येक युनिट रक्त एखाद्याच्या जीवनात बदल घडवू शकते. हे एक सुरक्षित आणि सोप्या प्रक्रियेचे कार्य आहे. या शिबिराचा



शुभारंभ कल्याण सेक्टर संयोजक जगन्नाथ म्हात्रे यांच्या उपस्थितीत सद्गुरू व निरंकार प्रभू चरणी प्रार्थना करून करण्यात आला. स्थानिक भिसोळ शाखा मुखी अनंत भोईर आणि सावर्णे शाखा मुखी रघुनाथ खाकर यांच्या देखरेखीखाली सेवादल स्वयंसेवक व निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांच्या संयुक्त प्रयत्नातून यशस्वी रित्या हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून संत निरंकारी मिशन मानवतेचा संदेशही देत आहे की, "मानवतेचा करा सन्मान, रक्तदानाच्या माध्यमातून द्या जीवनदान."

# भिवंडीत ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : जेष्ठ नागरिकांसाठी शासनाच्या माध्यमातून आरोग्यदायी, प्रवासी व तिर्थक्षेत्र सारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत त्यामुळे सिनिअर सिटीजन यांनी या योजनांचा लाभ घ्यावा,सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस यंत्रणा सुध्दा सहकार्य व मदत करीत आहे त्यामुळे जेष्ठ नागरिकांनी काही अडीअडचण निर्माण झाल्यास पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन भिवंडी निजामपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी भिवंडीत आयोजित कार्यक्रमात केले.

भिवंडीतील जेष्ठ नागरिक संघातील सदस्य व नागरिकांसाठी निमा वैद्यकीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेश दहापूते व निमा भिवंडी तालुका शाखा व एस.एस. हॉस्पिटल,काल्हेर यांच्या पुढाकाराने आदर्श पार्क येथील जेष्ठ नागरिक संघ (सेंट्रल)येथील सभागृहात वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबीर रविवार सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत होणार आयोजित करण्यात आले होते,यावेळी तज्ञ डॉ. राजेश दहापूते,डॉ.रमेश आडेप,डॉ.दत्तू वेनगंटी,डॉ. दिनुशा आर्या,डॉ.आकाश अगरहरि,डॉ.दर्शन भोईर यांनी उपस्थित नागरिकांचे हृदयविकार तपासणी,मधुमेह,रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण (BMI) तपासणी करून पथ्य व औषध संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सदानंद पिंपळे,सुभाष खिसमतराव, श्रीपत तांबे,जयवंत सोनटक्के, विनोद शेटे,नंदलाल परदेशी, जयश्री आळशी,वैष्णवी भोकरे,एमआर.दुर्योधन अदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमा भिवंडी तालुका शाखा व एस.एस. हॉस्पिटल, काल्हेर यांच्या सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



# केडीएमसी हद्दीत धुम्रपान करणाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / **कल्याण :** कल्याण डोंबिवली शहरात सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या २ हजार ८७८ जणांवर मागील ५ महिन्यात कोप्ता कायद्यांतर्गत कल्याण परिमंडळ ३ च्या पोलिसांकडून कारवाई करण्यात आली. शहरातील पानटपरीवर सिगारेटची विक्री केली जाते. अनेक जण सार्वजनिक ठिकाणी सिगारेट ओढताना दिसतात. ते सिगारेट ओढत असले तरी धुरामुळे इतरांना त्याचा जास्त त्रास होतो. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी असतानाही या नियमाचे उल्लंघन होताना दिसते. सिगारेट पिल्यामुळे त्याच्यापासून काय धोका होतो याची माहिती देणारा बोर्ड पानटपरीमध्ये लावला पाहिजे. त्याचबरोबर, टपरीजवळ ग्राहकांना थांबवून सिगारेट पिण्यास मनाई केली पाहिजे. जानेवारी ते मे पर्यंत कल्याण परिमंडल अंतर्गत म. फुले चौक ५७४, बाजारपेठ १८४, कोळसेवाडी ३९७, खडकपाडा २०५, रामनगर ४३९, विष्णूनगर ३८०, मानपाडा ३३२, टिळकनगर ३६७ जणांवर पोलीसांनी कोप्ता कारवाई केली असून सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांवर कारवाई करण्याची ही मोहीम अशीच सुरू राहणार असल्याचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.









## आजचे राशिभविष्य

**मेष**
तुम्ही फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा तुम्हाला दुखापत होण्याचा धोका जास्त आहे. जर

**वृषभ**
तुमच्या परिसरातील एखाद्याशी तुमचा वाद होत असेल तर तुम्हाला त्यात गप्प राहावे लागेल अन्यथा ते कायदेशीर प्रकरण बनू शकते.

**मिथुन**
कौटुंबिक मालमत्तेशी संबंधित वादांमध्ये तुम्हाला वरिष्ठांचे म्हणणे ऐकावे लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.

**कर्क**
बऱ्याच काळापासून कोणत्याही कामाबद्दल चिंतेत असाल तर मित्राच्या मदतीने ते काम पूर्ण होताना दिसते. कामाने वरिष्ठांना खूश करण्यात यशस्वी व्हाल.

**सिंह**
प्रेम जीवन जगणारे लोक त्यांच्या जोडीदारासोबत रोमँटिक दिवस घालवतील. तुम्ही स्वतःशी संबंधित माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीला देऊ नये.

**कन्या**
नोकरी बदलण्याचा विचार करणाऱ्या लोकांना चांगली ऑफर मिळू शकते. तुमच्या भूतकाळातील काही चुकांमधून तुम्हाला धडा घ्यावा लागेल.

**तूळ**
शिक्षणात येणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करावे लागतील.अडकलेले पैसे अचानक मिळाल्यानंतर आनंदी व्हाल.

**वृश्चिक**
नवीन काम सुरू करताना कोणत्याही बाहेरील व्यक्तीचा सल्ला घेऊ नका. भावंडांसोबत वाद झाला असेल तर त्यासाठी माफी मागावी लागू शकते.

**धनु**
मुलांकडून एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.प्रेम जीवन जगणाऱ्या लोकांना काही कारणांमुळे दोघांमध्ये तणावाचा सामना करावा लागू शकतो.

**मकर**
तुमचे पद आणि प्रतिष्ठा वाढल्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल. कोणतेही वाहन खूप काळजीपूर्वक चालवावे गाडी खराब झाल्याने आर्थिक खर्च वाढू शकतात.

**कुंभ**
तुमचा एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो, त्याच्याशी बोलून तुम्हाला आनंद होईल.

**मीन**
प्रतिकूल परिस्थितीतही तुम्हाला तुमच्या रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. जर तुम्हाला तुमच्या आर्थिक परिस्थितीबद्दल काळजी वाटत असेल.

# केडीएमसी परिसरातील मूर्तीकारांना शाडु मातीचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : यंदाचा श्री गणेशोत्सव पर्यावरण पुरक साजरा करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. आगामी श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मूर्तीकारांना शाडु मातीचे विनामूल्य वितरण करण्यात आले, यावेळी उपस्थित मूर्तीकारांशी संवाद साधताना महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी हे प्रतिपादन केले. महापालिका मुख्यालयात आज संपन्न झालेल्या या कार्यक्रमासमयी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, पर्यावरण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील अनेक मूर्तीकार उपस्थित होते.



> पर्यावरण पुरक श्री गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सहकार्य करावे
> – आयुक्त अभिनव गोयल

पीओपीच्या वापाराबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना आपल्याला या अगोदरच आपणास प्राप्त झालेल्या आहेत आणि श्री गणेश मूर्ती बनविणेसाठी लागणारी शाडुमाती आपण उपलब्ध करुन देत आहोत. मूर्तीकारांनी देखील पर्यावरणपुरक मूर्ती वापराबाबत जनजागृती करावी, त्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत महापालिका सहकार्य करेल, अशा शब्दात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी उपस्थित मूर्तीकारांना आश्वासित केले.

विनामुल्य शाडुमाती उपलब्ध करुन देण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने एक चांगले पाऊल उचलले आहे. तथापि, ही शाडूमाती पुढील वर्षी श्री गणेशोत्सवापूर्वी किमान 6 महिने आधी उपलब्ध करुन द्यावी तसेच महापालिका आयुक्तांनी मूर्तीकारांसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, असे विचार उपस्थित मूर्तीकारांनी मांडले. पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मूर्तीकारांना त्यांच्या आवश्यकतेनुसार शाडू माती उपलब्ध करुन दिली जाईल अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली. तसेच सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक मूर्तीच खरेदी करावी त्याचप्रमाणे विसर्जन देखिल पर्यावरण पूरकच करावे असे आवाहनही यावेळी केले.

# मराडेपाड्यात छत्रपती शिवाजी महाराज मंदिरात शिवराज्याभिषेक सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : शिवराज्यभिषेक व तिथीनुसार साजरी होणारी छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज शक्तिपीठ या ठिकाणी महाराजांना अभिवादन करून दोन दिवसीय सोहळयास सुरवात झाली.यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक ग्रामस्थ व शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.

.शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजुभाऊ चौधरी यांच्या हस्ते शक्तिपीठ मंदिराच्या प्रवेशद्वारावर स्वराज्य तोरण विधिवत पूजा करून उभारून शुभारंभ करण्यात आला. भिवंडी वाडा महामार्गावरील मराडे पाडा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर येथे ८ व ९ जून अशा दोन दिवसीय सोहळयात तिथीनुसार छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव व शिवराज्याभिषेक सोहळा निमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन शिवक्रांती प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.आज छत्रपती श्री. संभाजी महाराज यांची तिथी नुसार जयंती साजरी करण्यात येत आहे.त्या निमित्त मंदिरात जन्मोत्सव सोहळा व महिलां तर्फे पाळणा सादरीकरण केला गेला.तर सायंकाळी शिवतुलादान,देवीचा गोंधळ व रात्री शाहिरांच्या पोवाड्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ९ जून रोजी सोमवारी हिंदु साम्राज्य दिन, ध्वज पुजन,श्री शिवराज्याभिषेक सोहळा,श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची मिरवणूक सोहळा असे कार्यक्रमा होणार असल्याने शिवप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवक्रांती प्रतिष्ठानचे राजू भाऊ चौधरी यांनी केले आहे.



> **राज्यातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर शक्तिपीठाच्या माध्यमातून मराडेपाडा येथे साकारले असुन तीन महिन्यापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला.या मंदिरास आता पर्यंत सुमारे सहा लाखांहून अधिक शिवभक्तांनी भेट दिली आहे. या वर्षी प्रथमच या मंदिरात तिथी नुसार शिवराज्यभिषेक व छत्रपती संभाजी महाराज जयंती सोहळा साजरा केला जात आहे.**

# शिवसृष्टी निर्मितीसाठी शासनाकडून सर्वोतोपरी सहाय्य

## – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व आचार आदर्श मानून राज्य सरकारची वाटचाल सुरु आहे. पाचाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची माहिती देणारी भव्य दिव्य शिवसृष्टी उभारली जाणार असून, त्यासाठी सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जाईल. अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज जेष्ठ शुद्ध त्रयोदशी च्या दिवशी दुर्गराज रायगडवर मोठया उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, रोहयो मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री योगेश कदम, खा. श्रीरंग बारणे, आ. महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी किशन जावळे,पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, यांच्यासह कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष नितिन पावळे आदी मान्यवर आणि मोठ्या संख्येने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले शिवभक्त उपस्थित होते.

सर्वप्रथम शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले ही पवित्र भूमी शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. ३५२ वर्षांपूर्वी जर शिवराज्याभिषेक झाला नसता, तर आज आपण इथे नसतो. त्यांच्या दूरदृष्टी मुळे स्वराज्याचा पाया घालण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी जात-पात, धर्म, वर्ण या पलीकडे जाऊन रयतेचे राज्य प्रस्थापित केले. त्यामुळे ते फक्त महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे राष्ट्रनायक आहेत. पाकिस्तान बाबत जी भूमिका प्रधानमंत्री मोदीजींनी घेतली आहे त्यामागे देखील छत्रपती शिवाजी महाराज यांचीच प्रेरणा आहे असेही त्यांनी सांगितले.

काळ कितीही पुढे गेला आणि आपण कितीही तंत्रज्ञानाच्या गोष्टी केल्या तरी शिवाजी महाराजांचा वारसा आपण कुणीच विसरू शकणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले राज्यशासनाने गडकोट किल्ले आणि मंदिरांचं जतन, संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे.

छत्रपती महाराजांची, स्वराज्याची ओळख नव्याने करुन देण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन आपण पर्यटनाला चालना देतो आहे. त्यासाठी भारत गौरव यात्रेच्या' माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरु केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ट्रेनला आज हिरवा कंदील दाखवला असून या विशेष रेल्वे च्या माध्यमातून नागरिकांना ऐतिहासिक किल्ले आणि गडकोट पाहता येणार आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना राज्याचे रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी पेहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील "ऑपरेशन सिंदूर" मध्ये सहभागी वीर सैनिकांना मानवंदना दिली. त्यांनी शिवसृष्टीसाठी सरकारने मंजूर केलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीबाबत आराखडा तयार असून लवकरच काम सुरु होणार असल्याची माहिती दिली. "वारा, पाऊस, ऊन याची तमा न बाळगता स्वखर्चाने रायगडावर येऊन दोन दिवस सतत सेवा करणाऱ्या सर्व शिवभक्तांचे त्यांनी आभार मानले. शिवराज्याभिषेक सोहळयात प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांना रायगड पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली.या सोहळयाच्या निमित्ताने विविध शाहिरी कार्यक्रम, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे आणि मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक यामुळे रायगडावर शिवकाल अनुभवण्याचा अद्वितीय क्षण उपस्थितांना लाभला.

# चौदा गावांच्या विकास कामांसाठी निषेध मोर्चा !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली जवळील नवी मुंबई महापालिकेत सामाविष्ट झालेल्या त्या चौदा गावांचा विकास होत नाही. पालकमंत्री गणेश नाईक आणि नवी मुंबई महापालिका आयुक्त १४ गावातील पाणी, रस्ते आदी विकास कामांकडे दुर्लक्ष करीत आहेत. परिणामी सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचे अस्त्र काढून निषेध मोर्चा काढला. मात्र शिवसेना स्थानिक आमदार राजेश मोरे आणि भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी विकास कामांबाबत वरिष्ठांशी बैठक घेऊन येथील विकास कामे पूर्ण करू असे आश्वासन दिल्याने पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचे अस्त्र म्यान केलं आणि आंदोलन संपविले.



सोमवारी सकाळी त्या चौदा गावांच्या विकास कामासाठी चौदा गाव विकास समिती माध्यमातून दहिसर मोरी येथे निषेध आंदोलन केले. यावेळी शिवसेना आमदार राजेश मोरे, भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, समिती अध्यक्ष लक्ष्मण पाटील, शिवसेना पदाधिकारी बंडू पाटील, राष्ट्रवादीचे माळी, काँग्रेसचे संतोष केणे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी चौदा गाव समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी समिती अध्यक्ष लक्ष्मण पाटील म्हणाले, गणेश नाईक यांना येथील एक एक गाव आणि एक एक घर माहित आहे. पण त्यांना अचानक काय झाले ते आम्हाला माहित नाही. ही समितीही त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे. पण आता त्यानी दुर्लक्ष का केलं ते समजत नाही. नाईक फक्त नवी मुंबई पुरते मर्यादित नाहीत. ते महाराष्ट्राचे नेते आहेत, महाराष्ट्राचे मंत्री आहेत आणि भाजपचे नेते आहेत. ते आमचे नेते आणि युतीचे मंत्री आहेत. आमचे म्हणणे त्यांनी सविस्तर समजून घ्यावे आणि ते न्याय देतील अशी अपेक्षा आहे.

तर स्थानिक आमदार राजेश मोरे यांनी सांगितले की, नवी मुंबई पालिकेत ही चौदा गावे सामाविष्ट करून 14 महिने झाले तरीसुद्धा 14 गावची कामे होत नाहीत. येथील पदाधिकारी यांना येथील नागरिकांना उत्तर देणे कठीण होत आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांनी ठरवले आपापल्या पदाचे राजीनामे द्यायचे. पण त्यांना सांगितले की, तुम्ही राजीनामे द्यायचे नाहीत. गावातील विकास कामे होण्यासाठी व सर्व प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजीत पवार आणि आमदार रवींद्र चव्हाण यांच्याबरोबर बैठक घेऊन यातून ठोस मार्ग काढू. यासाठी मी स्वतः पावसाळी अधिवेशनात विधान भवनातील पायऱ्यावर बसून या प्रश्नावर लक्ष वेधून घेईन आणि नक्की विकासकामे होतील.

दरम्यान भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब म्हणाले सर्व परिस्थिती रवींद्र चव्हाण यांच्यापर्यंत पोहोचवणार आहे. महायुती म्हणून यामध्ये ते लक्ष घालणार आहेत. तीन पक्ष एकत्र असल्याने हे काम होणार नाही असं वाटत नाही. अखेर सर्वांच्या आश्वासनानंतर सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देऊ नका असे समिती अध्यक्ष लक्ष्मण पाटील यांनी सांगितले.

# पाऊस नसतानाही एमआयडीसीला तलावाचे स्वरूप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : एमआयडीसी विभागात पेंढारकर कॉलेज मागील पोस्ट ऑफिस तसेच पासपोर्ट ऑफिस याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. येथील नाल्याच्या तोंडावर कचरा आल्याने पोस्ट ऑफिस तसेच पासपोर्ट ऑफिस परिसरात पाऊस नसतानाही गुढघ्यापर्यंत पाणी जमा झाले. यामुळे नागरीकांना तेथे जाणे शक्य होत नव्हते. काही नागरीकांनी ऑफिसमध्ये जाण्याचा प्रयत्न केला असता त्यातील 3 ते 4 नागरीक पाण्यात पडले.



या विषयाची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेना विभाग अध्यक्ष संजय चव्हाण यांना समजताच त्यांनी लागलीच याची दखल घेऊन पोस्ट ऑफिस मध्ये पोहचुन पाहणी केली. तसेच अधिकारी वर्गास भेटून महानगर पालिका तसेच एमआयडीसी अधिकारी वर्गास पाणी काढण्या संदर्भात सुचना केल्या. परिणामी त्या परिसरात चार पाच ठिकाणी पाणी पंप लावुन पाणी काढण्यात आले. त्यामुळे नागरीकांना पोस्ट ऑफिस तसेच पासपोर्ट ऑफिस मध्ये जाण्याचा मार्ग ही मोकळा करण्यात आला. तसेच नाल्याच्या तोंडावरील कचरा साफ करण्याच्या कामाला लागलीच सुरुवात करण्यात आली आहे.

पुन्हा अशा परिस्थितीचा त्रास होऊ नये म्हणून एमआयडीसी तसेच महानगर पालिका अधिकारी यांना भेटून या समस्येवर कायम स्वरूपी मार्ग काढण्या संदर्भात निवेदन देण्यात येणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या ठिकाणी दर वर्षी मोठ्या प्रमाणात पाणी साचत असते. त्यामुळे पोस्ट तसेच पासपोर्ट कर्मचारी कामासाठी येणारे नागरीक यांना खुपच मोठया प्रमाणात त्रास होत असतो. ही समस्या सुटेपर्यंत महाराष्ट्र नवनिर्माण सेना सतत पाठपुरावा करत राहणार असेही संजय चव्हाण, अजय घोरपडे यांनी सांगितले.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत आज शिवराज्याभिषेक दिन (तिथीनुसार) उत्साहात संपन्न झाला. कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व आयुक्त दालनातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उप आयुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, महापालिका सचिव किशोर शेळके, ३/क प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत तसेच इतर अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

शिवराज्याभिषेक दिना निमित्त डोंबिवलीतही महापालिका अतिरिक्त आयुक्त -२ योगेश गोडसे यांनी मानपाडा रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी परिमंडळ-२ चे उपआयुक्त रमेश मिसाळ, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, ६/फ व ७/ग प्रभागाच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# ठाण्यात कोरोनाचा धोका वाढला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या वाढत आहे. आज ठाण्यामध्ये 9 कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे आता हा आकडा 108 वर पोहोचला आहे, यापैकी 59 कोरोना रुग्णांचे पाच दिवसांचे गृह विलगीकरण पूर्ण झाले आहे. तर 16 जणांवर रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. तर सध्या स्थितीमध्ये 32 जण गृह विलगीकरणात आहेत.

# भिवंडीत खाजगी रुग्णालये शासकीय योजनांचा देत नाहीत लाभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : भिवंडी : भिवंडी शहर परिसरात मोठ्या प्रमाणात खाजगी रूग्णालय कार्यरत आहेत मात्र यापैकी फक्त दोनच खाजगी रूग्णालयात शासकीय योजनांचा लाभ उपचारासाठी दाखल झालेल्या रूग्णाना मिळत आहे त्यामुळे इतर ठिकाणी उपचारासाठी दाखल झालेल्या रूग्णाना मोठ्या प्रमाणात अर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे. तर बहुसंख्य रूग्णाना मुंबई,

ठाणे सह अन्य शहरातील रूग्णालयात उपचारासाठी दाखल व्हावे लागत आहे,राज्य शासन भिवंडीत चालवित असलेल्या स्व इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात सुध्दा रूग्णांवर प्राथमिक उपचार करून त्यांना ठाणे व मुंबई येथे पाठवत आहेत त्यामुळे रूग्णांना हेडसांळ व खर्चिक त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे राज्य शासनाने याबाबत सविस्तर चौकशी करावी अशी मागणी होत आहे. भिवंडी शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे त्यामुळे रुग्णालयांची संख्या ही वाढत आहे. विविध ठिकाणी होणाऱ्या अपघात व इतर आजारा संदर्भात बहुतांशी लोकांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल व्हावे लागते. भिवंडी शहरातील खाजगी रुग्णालय मोठ्या प्रमाणावर आहेत. पण शहरातील 140 खाजगी नोंदणीकृत रुग्णालयांपैकी अवघ्या दोन रुग्णालयात शासकीय मोफत योजनांचा लाभ मिळत आहे.त्यामुळे शहर व ग्रामीण भागातील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करून घेण्यासाठी मोठ्या आर्थिक भुर्दंड व प्रवासी त्रास सोसावा लागत आहे. अनेक रुग्णांना शासकीय मोफत योजनांचा लाभ घेण्यासाठी ठाणे, मुंबई येथे जावे लागत असल्याने ही रुग्णांची हेळसांड होत आहे त्यामुळे हा गंभीर प्रकार थांबविण्यासाठी राज्य शासनाचे आरोग्य विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

**लाभार्थी रुग्णांचे हाल**

**भिवंडी शहरात पालिके कडे नोंदणीकृत १४० रुग्णालये आहेत.त्यापैकी २२ रुग्णालयात २५ पेक्षा अधिक बेड आहेत.साधारण शासकीय योजनांचा लाभ देणाऱ्या रुग्णालयात ५० बेड असणे आवश्यक आहे.पण त्यात शासनाने शिथिलता आणत ती बेड संख्या २५ वर आणून ठेवली आहे. शहर परिसरात मोठ्या प्रमाणात रुग्णालया आहेत त्यामुळे शासनाच्यावतीने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान कार्ड ज्यामध्ये ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत देण्याची जाहिरातबाजी सरकार मोठ्या प्रमाणावर करते पण खरच या योजनांचा लाभ नागरिकांना मिळतो.याबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. शहरात मोठ्या प्रमाणात रुग्णालय आहे पण या रुग्णालय व्यवस्थापनाकडून शासकीय योजनां राबविण्यासाठी कोणत्याही प्रकारचा शासनस्तरावर अर्ज केले नाहीत त्यामुळे या रूग्णालयात दाखल होणाऱ्या रूग्णांकडून मोठ्या प्रमाणात फि आकारणी केली जात असल्याची पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.भिवंडी हे कामगार वस्तीचे शहर म्हणून ओळखले जाते.मात्र त्यांच्या सोयीसाठी अत्याधुनिक असे रूग्णालय नाही. स्व. इंदिरा गांधी शासकीय उपजिल्हा रुग्णालय उपलब्ध आहे.पण तेथे ही तुटपुंजे उपचार होत असल्याने दाखल होणाऱ्या रुग्णांना ठाणे व मुंबई येथे उपचारासाठी रवाना केले जाते.त्यामुळे या रूग्णांची मोठ्या प्रमाणात हेडसांळ होते. खाजगी रूग्णालयात शासकीय योजनेतून मोफत योजनेचा लाभ रुग्णांना घेता येत नाही. भिवंडीत फक्त सिराज हॉस्पिटल व नोबल हॉस्पिटल या दोनच ठिकाणी शासकीय योजना लागू आहेत अन्य रूग्णालय व्यवस्थापन शासकीय योजना राबवित नसल्याने रूग्णाना मोठा अर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे सांगत आहेत.शासनाने रुग्णांना मोफत उपचार सुविधा देणाऱ्या शासकीय योजना राबवण्या साठी ५० बेडची अट शिथिल केली असून,३० बेड असणाऱ्या रुग्णालयांमध्ये सुद्धा उपचार घेणाऱ्या रुग्णांना आता या योजनांचा लाभ देता येणार आहे.त्यामुळे या पुढे नोंदणी होणाऱ्या सर्व रुग्णालयांना शासकीय योजना राबविणे क्रमप्राप्त ठरणार आहे अशी माहिती पालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभागाचे नियंत्रण अधिकारी डॉ. जयवंत धुळे यांनी दिली आहे.तर शहरातील २५ बेड सुविधा असणाऱ्या २१ रुग्णालय व्यवस्थापनांना भिवंडी शहरातील रुग्णांना महात्मा जोतिबा जन आरोग्य योजना या शासकीय मोफत उपचार योजनांचा लाभ मिळवून देणे बंधनकारक आहे.त्यासाठी पालिका आरोग्य विभागाने सर्वांना पत्र देऊन योजने मध्ये लवकरात लवकर समाविष्ट होण्या बाबत कळिवण्यात आले आहे माहिती डॉ. जयवंत धुळे यांनी दिली आहे.**

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई,संचलित
जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी (दळखण)
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१(मुंबई विद्यापीठाशी संलग्न) ISO 9001 : 2005
विद्यार्थ्यांची स्वप्न अनेक पण स्वप्नपूर्तीचं केंद्र एक...
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT)
UNDER GRADUATION: B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com, M.A. मराठी, M.A. अर्थशास्त्र, M.A. समाजशास्त्र, M.A. भूगोल
ADMISSION OPEN
For More Details Email - jeevandeepkhardi@gmail.com
Website- www.jsspcollegekhardi.in
8669244522, 9167043099
9923992390, 9619188558

# भिवंडीमध्ये बकरी ईद सण उत्साहात साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /**भिवंडी** : दिनांक 07 जून, 2025 ते 09 जून, 2025 या कालावधीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा झाला असुन महानगरपालिका प्रशासन यासाठी पुर्ण तयारीसह सज्ज होते. यावर्षी 56 ठिकाणी कुर्बानी करण्यासाठी परवानगीचे अर्ज प्राप्त झाले असून या केंद्रावर दिनांक 7-9 जून या कालावधीत एकूण 8067 जनावरांची कुर्बानी देण्यात आली तर, महानगरपालिकेला रु.17,89,650/- फी स्वरुपात वसुली झाली आहे. बकरी ईदसाठी या 56 केंद्राकरिता 200 टेम्पो, 14 जेसीबी, 11 जीप, 3 फराना तसेच कुर्बानीनंतर तेथील भागाची स्वच्छता करण्याकरिता 40 पाण्याचे टँकरचे अधिग्रहण करण्यात आले होते. तसेच, कुर्बानीपुर्वी जनावरांची तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय विभागाकडून 60 पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या वर्षी प्रत्येक प्रभागसमिती निहाय वाहनांचे सुयोग्य वाटप करुन ती वाहने आदल्या दिवशीच प्रभाग समितीमध्ये रवाना करण्यात आली होती. ज्यामुळे कुर्बानीनंतर अपशिष्ट उचलणे, तेथे पाण्याने स्वच्छता करणे आणि औषध फवारणी करणे ही कामे वेळेआधीच पुर्ण करण्यात आरोग्य विभागाला यश आले. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे स्थानिक नागरीक, माजी नगरसेवक, तसेच समाजसेवक यांनीदेखील समाधान व्यक्त करुन महानगरपालिकेचे धन्यवाद व्यक्त केले आहे. महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी देखील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले. तसेच, मार्केट, आरोग्य, पाणी पुरवठा, वाहन, पशु वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस या विभागांचे आपापसातील समन्वय आणि कर्मचाऱ्यांचे नियोजन यामुळे तसेच, सर्व कर्मचारी संघटना आणि शहरातील नागरिकांनी केलेल्या सहकार्यामुळे बकरी ईद हा सण आनंदात तसेच शांततेत पार पडल्याचे नमुद करुन सर्वांचे आभार व्यक्त केले आहे.

# कल्याण कृषी विभागामार्फत पळसोलीत एसआरटी पध्दतीने भात पेरणी प्रशिक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुका कृषी विभागा मार्फत शेतकऱ्यांना शेती विषयक प्रशिक्षणाचे आयोजन गाव पातळीवर केले जाते. याच अनुषंगाने कल्याण तालुक्यातील पळसोली गाव परिसरात दिपक चव्हाण यांच्या मयंक कृषी पर्यटन पळसोली केंद्रात एसआरटी भात लागवड, पेरणी यंत्राने, साच्याच्या साह्याने भात लागवड विषयी शेतकरी कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये एसआरटी भात लागवड, पट्टा पद्धत, यंत्राद्वारे लागवड करणारे सर्व प्रगतशील शेतकरी तसेच पंचक्रोशीमधील ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद भोकरे यांनी एसआरटी भात शेती बाबत सखोल मार्गदर्शन केले. एसआरटी शेतीमुळे जमीन मशागत, बियाणे, खते, मजूर इत्यादी गोष्टीचा खर्च कमी होतो याबाबत मार्गदर्शन केले. सगुणा राईस तंत्र ही भात लागवडीची एक नवीन पद्धत आहे. जी शून्य मशागत आणि संवर्धन कृषीवर आधारित आहे. या पद्धतीत नांगरणी, गाळ काढणे आणि लावणी न करता, कायमस्वरूपी उंच वाफ्यांवर भात लागवड केली जाते. सगुणा राईस तंत्र या पद्धतीमुळे भात लागवडीचा खर्च कमी होतो, उत्पादन वाढते आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते.



एसआरटी पद्धती मध्ये शेतात उंच गादी वाफे तयार केले जातात. गादी वाफ्यावर ठराविक अंतराने भात बियाणे टोकले जातात. जमिनीत ओल टिकून राहील, परंतु पाणी साठून राहणार नाही अशा पद्धतीने पाणी व्यवस्थापन केले जाते. तण नियंत्रणासाठी नांगरणी, खड्डा खोदणे आणि कोळपणी टाळली जाते. आंतर मशागतीसाठी कोळपणी यंत्र वापरले जाते. खत आणि बियाणे यांचा योग्य वापर केला जातो, ज्यामुळे खर्च कमी होतो. या पद्धतीमुळे भात उत्पादन वाढते आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. ही पद्धत पर्यावरणपूरक आहे, कारण त्यात रासायनिक खतांचा वापर कमी होतो आणि जमिनीची धूप थांबते.एसआरटी या पद्धतीमुळे भात लागवडीचा खर्च 30 ते40टक्के ने कमी होतो. उत्पादन वाढते, ज्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. ही पद्धत पर्यावरणपूरक आहे. कारण त्यात रासायनिक खतांचा वापर कमी होतो आणि जमिनीची धूप थांबते. नांगरणी आणि इतर मशागतीचे काम कमी झाल्याने श्रमाची बचत होते. यावेळी उपकृषी अधिकारी विजय पाटील यांनी यंत्राद्वारे भात पेरणी मधील बारकावे याबाबत बियाणे व खते व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले. तालुका तंत्र व्यवस्थापक वैशाली भापसे यांनी जमीन आरोग्य पत्रिका महत्त्व, माती नमुना कसा घ्यावा, गटाचे रेकॉर्ड जतन करणे, बचत जमा करणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी शेतकरी दीपक चव्हाण यांनी मागील वर्षीचा एसआरटी शेतीचा अनुभव सांगितला व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी एसआरटी शेतीकडे वळावे असे आव्हान शेतकरी वर्गाला केले. या प्रशिक्षण प्रसंगी प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर चौधरी, चंदन कडव, पुंडलिक चौधरी, जयवंत दिवाणे, शरद दिवाणे, भास्कर दिवाणे, शिवाजी चौधरी, तेजस तारमले, श्रीराम पालवी उपस्थित होते.

# बैल बाजार प्रभागात विद्यार्थ्यांचा गुण गौरव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /**कल्याण** : कल्याण मधील प्रभाग क्रमांक 36 बैल बाजार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि यंगस्टर युवा फाउंडेशन आयोजित विद्यार्थी गुण गौरव समारंभ रविवारी जिजामाता उद्यान सांगळेवाडी कल्याण पश्चिम येथे संपन्न झाला. विधानसभा सहसंघटक रुपेश भोईर यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना शालेय वस्तूं, वह्या, पेन, बॅग आणि कागदपत्रे ठेवण्यास फोल्डर बॅग इत्यादी साहित्यांचे वाटप करण्यात आले. शालेय उपयोगी वस्तू मिळाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खर्डीकर क्लासेसचे संकेत खर्डीकर आणि लेखक श्रीकांत पेटकर यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी शिवसेना उपनेते अल्ताफ भाई शेख, शहर प्रमुख बाळा परब, उपशहर प्रमुख दत्ता खंडागळे, दिनेश शेटे, विभाग प्रमुख महिला रंजना सांगळे, उपशहर संघटक रूपाली भोईर, आरती बागवे, मौसम सिन्हा, राजू दिक्षित, भागवत बैसाने, राजेश महाले, विकास रोकडे, प्रथमेश पुण्यार्थी, सुनील वाळंज, नंदू जोशी, जगदीश वाघचौडे, श्याम मेमाने, सादिक शेख, उदय गावडे, महेंद्र घोलप, लेखराज महाले, आदेश इंदापूरकर, प्रशांत जाधव, स्वप्निल करपे, राजू नाटे, अंबादास बैरागी, दयालसिंग दुर्वे, वीरेंद्र गुप्ता उपस्थित होते.

# आ. संजय केळकरांचा 'आमदार आपल्या दारी' उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : 'आमदार आपल्या दारी' या जनसंवाद उपक्रमा अंतर्गत ठाणे शहर जेष्ठ आमदार जनसेवक श्री. संजय केळकर प्रत्यक्ष सामान्य जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्याशी सुसंवाद साधतात व जनतेच्या समस्या ऐकून घेतात. आमदार केळकर यांचा २५३ वा 'आमदार आपल्या दारी' हा कार्यक्रम रविवार ८ जुन २५ रोजी स्वस्तिक पाल्म्स् सोसायटी, ब्रह्मांड ठाणे येथे रविवारी पार पडला. समाजसेवक, ब्रह्मांड कट्टा संस्थेचे संस्थापक व भाजपा ठाणे शहर मा.उपाध्यक्ष व एक भारत श्रेष्ठ भारत अभियानाचे संयोजक राजेश जाधव यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास आसपासचा परिसर व ठाणे शहरातील नागरिक मोठ्या



संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी गृहसंकुल विषयक समस्या, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, रस्ते वाहतूक, स्त्रिया व लहान मुले यांची दैनंदिन सुरक्षितता, व्यसनी गर्दुल्यांची गृहसंकुल परिसरातील वाढती संख्या, आरोग्य व्यवस्था, सुशोभीकरण, सार्वजनिक शौचालय, सांडपाण्याचा निचरा, सांस्कृतिक उपक्रमांसाठी सभागृह व कलादालन अशा अनेक मागण्या व समस्या आमदार केळकर साहेबांससमोर मांडल्या. आमदार केळकर यांनी सर्व अर्ज स्वीकारले व त्यानंतर प्रत्येक अर्जावर उपस्थितांशी थोडक्यात चर्चा केली. ब्रह्मांडचे रहिवासी असलेले ज्येष्ठ साहित्यकार कै. दाजीशास्त्री पणशीकर यांचे नुकतिच देवाज्ञा झाली. ब्रह्मांड परिसरात सांस्कृतिक केंद्र उभारून त्यास दाजी शास्त्री पणशीकरांचे नाव द्यावे असा अर्ज प्रख्यात चित्रकार विजयराज बोधनकर व राजेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील रहिवाशांतर्फे देण्यात आला. या सर्व अर्जांवर सखोल अभ्यास करून त्यावर कार्यवाही केली जाईल असे आश्वासन आमदार केळकर यांनी दिले. याप्रसंगी मा. नगरसेवक मनोहर डुंबरे, विकास पाटील, स्वप्नाली साळवी, रवी रेड्डी, महेश जोशी, अनंत पाटील, वर्षा गंद्रे, ऋजुता देशपांडे, स्नेहल जोशी, महेंद्र देशमुख, व्ही. शिवकुमार, सुहास भाकरे, विजराज बोधनकार, बापू भोगटे, तुकाराम पवार, रोहित प्रभू, उषा रायचौधरी, एस. आर. यादव, प्रा. अनिल आठवले, पांडुरंग पट्टेकर, दिनकर वाघमारे, प्रगती जाधव, सुनील नरे तसेच परिसरातील सोसायटी पदाधिकारी, सामाजिक संस्था व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणार्थींच्या समस्या शासन दरबारी मांडणार - आ. निरंजन डावखरे




## प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून दिला मानसिक आधार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : राज्यात 2 जून पासून वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून, या प्रशिक्षणामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत. या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार निरंजन डावखरे यांनी एम एच हायस्कूल ठाणे येथे सुरू असलेल्या वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणास भेट देऊन प्रशिक्षणार्थी, सुलभक व केंद्र समन्वयक यांच्याशी संवाद साधून समस्या समजून घेतल्या. तसेच प्रशिक्षणार्थींच्या सर्व समस्या शासन दरबारी मांडल्या जातील व त्या समस्यांवरती निराकरण केले जाईल असे आश्वासन आमदार निरंजन डावखरे यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना केले.

प्रशिक्षणादरम्यान टेस्ट लिंक ओपन न होणे, भाषानिहाय अभ्यास पुस्तिका मिळावी, कला क्रीडा शिक्षक हे संपूर्ण प्रशिक्षणावर परीक्षा देणार आहेत म्हणून इतरांनाही देण्यात आलेले अभ्यासपुस्तक हे कला क्रीडा शिक्षकांनाही देण्यात यावे, प्रशिक्षणाचा कालावधी हा जास्त ठेवण्यात आलेला आहे, अनेक शिक्षक प्रशिक्षणास पहिल्या दिवसापासून वेळेवर उपस्थित असून पहिल्या हजेरी पत्रक यादीत त्यांचे नाव आले होते. परंतू नंतरच्या याद्यांमध्ये त्यांची नावे येत नाहीत.

तसेच व्हायरल इन्फेक्शनमुळे अचानक आजारी पडलेले शिक्षक, घरात आलेल्या अचानक वैद्यकीय समस्येमध्ये व्यस्त शिक्षक यांची एकदिवसाची उपस्थिती संदर्भात या शिक्षकाला अडचण येऊ नये यासाठी १००% उपस्थितीच्या नियमात शिथिलता द्यावी. प्रशिक्षणासाठी दोन हजार रुपये मूल्य आकारले असून आवश्यक सुविधा, सुयोग्य बैठक व्यवस्था, भोजन, चहा याचे कोणतेही नियोजन नाही. या प्रशिक्षणार्थींच्या अशा विविध समस्ये संदर्भात कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे यांनी संवाद साधून प्रशिक्षणार्थींना धीर दिला आहे. यावेळी भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलकर, जनरल एज्युकेशन संस्था संचालक राजेंद्रसिंग राजपूत, वरिष्ठ आधीविख्यता डॉ. भगवान खारके, डॉ. प्रभा खरटमोल, अधिविख्याता, विश्वनाथ बिरारी, क्रीडा शिक्षक संतोष कदम, विनायक पाटील, अर्जुन चेमटे, सुनिल जाधव सह शिक्षक उपस्थित होते.







# कुणाल पाटीलांनी घेतली डॉ. श्रीकांत शिंदेंची भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सदस्य तथा अपक्ष नगरसेवक कुणाल पाटील यांनी नुकतीच भेट घेतली. यावेळी पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानचा खरा दहशतवादी चेहरा संपूर्ण जगाला माहिती व्हावा यासाठी नियुक्त केलेल्या शिष्टमंडळात खासदारांची निवड होऊन, त्यांनी हा जागतिक दौरा यशस्वी करून भारताची बाजू परखडपणे मांडली याबाबत त्यांचे भेटून कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

त्याचप्रमाणे कल्याण लोकसभेतील ग्रामीण भागातील 27 गावे आणि आसपासच्या परिसरात विविध विकासकामे व्हावी, या विकासकामांसाठी निधीची उपलब्धता व्हावी यासाठी चर्चा केली. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून कल्याण लोकसभेत कोट्यवधींची विकासकामे सुरू असून आणखी विकासकामे करण्यासाठी भरगोस निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले असल्याची माहिती कुणाल पाटील यांनी दिली.

# आगरी-कोळी 'सिंगिंग स्टार' स्पर्धेत भूपेन नागा प्रथम क्रमांकाचे मानकरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : हल्ली इंडस्ट्रीज मध्ये नवोदित कलाकारांना अनेक प्रकारचे प्लॅटफॉर्म उपलब्ध झाल्यानंतर,कलाविश्वात प्रवेश मिळवण्यासाठी त्यांना अनेक अनेक प्रकारचं विविध संधी मिळत आहेत.अशीच एक संधी ऑनलाइन व ऑफलाइन "सिंगिंग स्टार"स्पर्धेनिमित्ताने मुंबईतील वेसावे येथील रविराज स्टुडिओचे संचालक रवींद्र कृष्णा खर्डे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या स्पर्धेमध्ये आपल्या दमदार व भावस्पर्शी आवाजाने केवळ परीक्षक नव्हे, तर प्रेक्षकांनाही मंत्रमुग्ध करीत भूपेन नागा यांने अंतिम फेरीमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्यात बाजी मारली,या स्पर्धेचा तो मानकरी ठरला. मुंबई मधील मालाड येथील चिल्ड्रन वेल्फेअर सोसायटी लॉ कॉलेजच्या सभागृहामध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे डॉ. सनी वालिया,किरण निजाई, प्रभाकर तांडेल हे उपस्थित होते.

गेल्या वर्षभरापासून ऑनलाईन व ऑफलाईन सुरू झालेल्या या स्पर्धेमध्ये गाजलेली पारंपारिक कोळी-आगरी गाण्यांची ही अंतिम स्पर्धा मोठ्या भव्य दिव्य पणे प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीमध्ये अंतिम स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा विजेता भूपेन नागा याला "सिंगिंग स्टार"म्हणून अनेक मान्यवर व प्रेक्षकांच्या टाळयांच्या गजरांमध्ये गौरवण्यात आले.

सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून ७६ गायक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता आणि आजच्या या अंतिम फेरीमध्ये धरती पाटील, शैवी काळे ,चैताली गवळी, सुनील तेली, विरेन कासकर,निमिषा खर्डे ,गोपीनाथ निवटे,भावना केंडे,रोहित सुकुर, मुकेश पाटील, मयुरी कासकर, धनंजय कोळी, निवेदिता हमाव सीमा कठीण निरंजन भगत मुकेश साठी असे १२ प्रतिभावान कलाकार सहभागी झाले होते.

सहभागी स्पर्धक कलाकारांनी अगदी जीव ओतून मनापासून देणगी लाभलेल्या आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्याचे रंगतदार चुरस उपस्थित प्रमुख पाहुणे इंडस्ट्रीतील अनेक मान्यवर आणि प्रेक्षकांना पारंपारिक कोळी-आगरी प्रसिद्ध गाण्यांची स्पर्धेनिमित्त संगीतमय मनोरंजनाची मेजवानीच ठरली. परंतु परीक्षकांनाही ही स्पर्धा चुरशीची झाल्याने निकाल देण्यात परीक्षक म्हणून त्यांचा कस लागला.

संगीतमय चुरशीच्या व आपल्या आवाजातील जादूने सर्वच स्पर्धकांनी आपल्याकडील बेस्ट देण्याचा शेवटपर्यंत आटोकाट प्रयत्न केले. अंतिम फेरीतील बारा स्पर्धकांपैकी अंतिम विजेते प्रेक्षक व परीक्षकांच्या सर्व निकषातून पसंतीला उतरलेले प्रथम क्रमांक भूपेन नागा, द्वितीय क्रमांक निवेदिता हमाव व तृतीय क्रमांक निमिषा खर्डे यांना विजेते म्हणून घोषित करण्यात आले. त्याप्रसंगी प्रेक्षकांनी एकच जल्लोष करून विजेत्यांना अक्षरशः डोक्यावरच घेतले. अंतिम फेरीतील विजेत्यांना एकता मंचचे उपाध्यक्ष प्रशांत काशीद यांच्या हस्ते गौरव चिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले तर मुकेश पाटील व धनंजय कोळी यांना प्रोत्साहन पर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अंतिम फेरी अत्यंत उत्कृष्टपणे लीलया पार पाडली. यावेळी संगीतप्रेमी रसिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून स्पर्धक व विजेत्यांना मनापासून दात देत अभिनंदनही केले. जल्लोषपूर्ण प्रसिद्ध गीताचे सादरीकरण संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत असलेले सुप्रसिद्ध "सुपली सोन्याची......" या गाण्यानं धमाल उडवली. सोशल मीडियावर सध्या विविध कलाकारांसह, रील स्टारही मोठ्या प्रमाणावर या गाण्याचा वापर करून रील बनवताना दिसतात, त्यावरून या गाण्याची लोकप्रियता लक्षात येते.नेमकं याच गाण्याच्या प्रसिद्ध गायिका व कोळी संस्कृती जतन करणाऱ्या धवलारीन म्हणून ओळख असणाऱ्या त्यांनीच स्वरचित केलेलं हे गाणं भागीरथी ताई कोळी यांनी आपल्या सुमधुर आवाजामध्ये, अनोख्या अंदाजाने"सुपली सोन्याची....." या गाण्याची सुरुवात करताच सभागृहामध्ये जल्लोषपूर्ण वातावरण निर्माण झाले आणि प्रेक्षकांनी गाण्याला मनापासून दात देऊन टाळयांच्या गजरात व नृत्यासह सभागृह डोक्यावर घेऊन आनंद व्यक्त केला.

# दिवा-मुंब्रा रेल्वे अपघातातील जखमींना मंत्र्यांची भेट

## तातडीच्या उपचाराचे निर्देश

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून मृतांना श्रद्धांजली**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान झालेल्या रेल्वे प्रवासी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, राज्याचे जलसंपदा (तापी, विदर्भ आणि कोकण) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, डॉ.नरेश म्हस्के, आमदार रवींद्र चव्हाण, निरंजन डावखरे आणि राजेश मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची भेट घेवून विचारपूस केली. यावेळी त्यांनी ठाणे व कळवा येथील रुग्णालयांना जखमींवर तातडीने उपचार करण्याचे निर्देश दिले. तसेच, या कठीण प्रसंगात शासन पूर्णपणे जखमी व त्यांच्या नातेवाईकांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली.

या हृदयद्रावक दुर्घटनेतील मृतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी मृतकांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचेही सांगितले. या दुर्घटनेनंतर ठाणे जिल्हा प्रशासन संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे. प्रशासनाकडून बचावकार्य आणि जखमींना मदत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ही घटना कशी घडली, याबाबत चौकशी सुरू असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष पर्यटक रेल्वेचे माणगाव येथे शाही स्वागत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**बोरवर** : महाराष्ट्र शासन व भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी भारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत आज पासून प्रवासासाठी निघालेल्या विशेष पर्यटक रेल्वे 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट'चे माणगाव रेल्वेस्थानकावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. या सर्व पर्यटकांनी आज दुर्गराज रायगडला भेट देऊन पाहणी केली.

या विशेष रेल्वेच्या माणगाव स्थानकावर आगमनप्रसंगी खा. सुनील तटकरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, माणगाव तहसीलदार दशरथ काळे, भारतीय रेल्वे पर्यटन मंडळ अधिकारी श्रीमती गुप्ता यांसह रेल्वे चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या विशेष रेल्वे मधुन प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे रेल्वे स्थानकावर रायगड जिल्हा प्रशासनाने पारंपरिक ढोल-ताशाच्या गजरात औक्षण करून स्वागत केले. तसेच पर्यटकांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना दुर्गराज रायगडची पर्यटनाच्या दृष्टीने माहिती देणारी घडी पुस्तिका वाटप करण्यात



आले. शिवराज्याभिषेक दिनाच्या मुहूर्तावर स्वराज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला पहायला, अनुभवायला मिळणार म्हणून पर्यटकामध्ये उत्साही वातावरण होते. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी च्या जयघोषाने माणगावरेल्वे स्थानक काही काळ दुमदुमून गेले होते. एकूण 18 बसेस मधून हे सर्व पर्यटक रायगड किल्ल्यासाठी रवाना झाले. दिवसभर रायगड किल्ल्याची पाहणी केल्यानंतर सायंकाळी ही विशेष रेल्वे पुण्याकडे प्रयाण करणार आहे. 5 दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते महाराजांच्या गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेणार आहेत.

या पाच दिवशीय विशेष रेल्वेचे नियोजन पुढीलप्रमाणे :

लाल महाल, पुणे – छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले.
कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे – पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय.
शिवनेरी किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ.
भीमाशंकर ज्योतिर्लिंग – 12 ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ.
प्रतापगड किल्ला – अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण.
कोल्हापूर – महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला – बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024